REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2020

# अण्णा हजारे यांचे ग्राम सुधारणांविषयीचे विचार आणि कार्य

प्रा.डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,
मोराणे, ता.जि.धुळे.

## प्रास्ताविक :—



महात्मा गांधीजींच्या सामाजिक सुधारणा विषयीच्या धोरणांचा प्रभाव असलेल्या अण्णा हजारे यांनी स्वयंपूर्ण ग्राम उभारणीचे ध्येय बाळगले. गांधी विचारांबरोबरच स्वामी विवेकानंद यांच्या कृतिशील कार्य आणि विचारांचाही प्रभाव अण्णांवर पडला होता. गांधीजी आणि स्वामीजींच्या साहित्याचा त्यांच्या चरित्रग्रंथांचा अण्णा हे निस्सीम अभ्यासक होते. यातूनच अण्णांना खेडे ह्या आपल्या देशातील स्वयंपूर्ण घटकाच्या सुधारणेविषयीचे ध्येय ठरविता आले. आपल्या देशातील संतांच्या कामगिरीने आणि त्यांच्या उद्बोधनपर अशा साहित्यानेही अण्णांना सुधारणेची नवी दिशा प्राप्त झाली होती. म्हणूनच अण्णांचा देव हा रंजल्या—गांजलेल्या मध्ये होता. सर्वसामान्य माणसात होता. म्हणूनच मानवी सेवा म्हणजेच ईश्वरी सेवा हा मूलमंत्र स्वीकारून अण्णांनी ग्राम समाजसुधारणेचे व्रत स्वीकारले. मुळातच समाज आणि देशसेवेचा पिंड असलेले अण्णा सुरूवातीस लष्करात भरती झाले. सन 1962 मधील भारत—चीन युद्धात रसद पुरवठा करणाऱ्या मोटारीचे ड्रायव्हर म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. अण्णा लहानपणापासूनच स्वाभिमानी व अन्यायाविरुद्ध लढणारे होते. जवानांच्या समस्या ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सरळपणे मांडीत असत. अतिशय संवेदनशील विचारांच्या अण्णांनी तर एकदा आत्मत्यागाचाही विचार केला होता. मात्र स्वामी विवेकानंद आणि संत साहित्यातून त्यांना आत्मबोध झाला आणि शेवटी हा देह समाजाच्या उत्थानाकरिता घालवावा या हेतूने प्रेरित होऊन अण्णा समाजसेवेकडे वळाले.

## अध्यात्मिकतेच्या संस्कारातून ग्रामसुधारणेस प्रारंभ :—

अण्णांनी देशसेवाकरिता लष्करी नोकरी पत्करली होती. सन 1975 मध्ये लष्करी सेवेतून मुक्त होऊन राळेगणसिद्धी (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथे परतलेत. अण्णांचे गाव अनेक समस्यांनी जर्जर झाले होते. गावात उपासमार होती. व्यसनाधीनता कमालीची वाढली होती. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होतेच. शैक्षणिक आणि आरोग्यविषयक सोयीसुविधांचा अभाव होता. स्त्रियांवर अन्याय—अत्याचार तर अधिकतेने वाढले होते. म्हणून प्रारंभीच अण्णांनी या सर्व समस्यांवर उपाय योजनेस प्रारंभ केला. याकरिता अण्णांनी श्रद्धेने लोकांवर वचक निर्माण करावयाचा, त्यांना भीती दाखवायची असा विचार केला. याकरिता अण्णांनी आध्यात्मिकतेचा मार्ग हाती घेतला. त्यातूनच गावातील संत यादव बाबांच्या मंदिराच्या जीर्णोद्धार करून भजन, कीर्तनाच्या संस्कारातून लोकांना सद्वर्तनी बनविण्यास सुरुवात केली होती आणि येथूनच अण्णांनी अध्यात्मिकतेच्या संस्कारातून ग्राम सुधारण्याच्या कार्याला सुरुवात केली.[1]

## व्यसनमुक्त आदर्श ग्रामाची उभारणी :—

स्वतः अण्णांना व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी जाणिवा होत्या. राळेगणसिद्धीतील तरुण व्यसनांध बनले होते. त्यांना त्यातून बाहेर काढून विधायक मार्गावर आणणे आवश्यक होते. याकरिता अण्णांनी

पाणलोट क्षेत्र विकासातून शेती उत्पादन व दुग्ध उत्पादन वाढविण्यावर भर दिला. असे व्यवसाय भरभराटीस आणल्यामुळे दारू पाडणे व विकणे ह्या ग्रामव्यवस्थेतील व्यवसायावर बंदी आणता आली. तसेच किराणा दुकानदारांना सामोपचाराने समजावून सांगून तंबाखू, गुटका, बार, बिडी, सिगारेट सारख्या धूम्रपानाच्या वस्तू ठेवणे आणि विकणे यावर बंदी घालण्यात आली. ग्राम सुधारणा आणि विकास साधनेचे व्यसनमुक्त ग्रामसमाज ही गुरुकिल्ली असल्याचे महत्त्व अण्णांनी राळेगणसिद्धीच्या लोकांना पटवून दिले. लोकांनीही अण्णांच्या या सुधारणावादी विचार आणि कार्याचे मनापासून स्वागत केले. म्हणजेच ग्रामसुधारणेची पहिली पायरी चढण्यात अण्णांना यश मिळाले. ही अण्णांच्या ग्रामसुधारणा कार्याची जमेची बाजू होती.[2]

यातूनच अण्णांनी साम–दाम–दंड या नीतीचा अवलंब करून व्यसनमुक्त ग्रामाची वाटचाल चालविली. गावात जरी दारू पाजणे व विक्री करणे बंद झाले, धूम्रपानाच्या वस्तू विक्री बंद झाली तरी काही तरुण गावकरी बाहेरून मद्यपान व धूम्रपान करून येत. म्हणून अण्णांनी गावकऱ्यांमार्फतच त्यांना सार्वजनिक दंड व फटके मारण्याच्या शिक्षा दिल्यात. ग्रामसभेत तसे ठराव करून घेतलेत व सामूहिकपणे ग्रामसभा व गावकरी यांचेमार्फत व्यसनमुक्ती ग्रामचे ध्येय अण्णांनी साध्य केले.[3]

## कुटुंब नियोजन :–

मानवी जीवनाला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचा उगम लोकसंख्यावाढीतूनच होत असतो, हे अण्णांच्या लक्षात आले होते. म्हणूनच वाढती महागाई, आर्थिक टंचाई, रोगराई, अन्नधान्य टंचाई, अनारोग्य यावर कुटुंब नियोजन हा एकमेव आणि चांगला उपाय असल्याचे त्यांनी ग्रामस्थांना पटवून दिले. लोकसंख्या जर नियंत्रित राहिली तर सर्वत्र खूशहाली राहील, असे अण्णांचे मत होते. शासनाने कायदा केलेला असला तरी त्याची कसोशीने अंमलबजावणी होत नसल्याने असलेल्या समस्यांचा निचरा होत नाही. याबाबत प्रत्येक गावात ग्रामसभेत ठराव करून जर ग्राम पातळीवर प्रयत्न झाले तर वाढत्या लोकसंख्येला आळा बसेल. एवढेच नव्हे तर अण्णांनी राळेगणसिद्धीच्या ग्रामसभेत कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देऊन प्रत्यक्ष कारवाई केली. ग्रामसभेत तसा ठराव पास करुन गावातील लोकांनी कसोशीने त्याचे पालन करावे, अशी सक्तीच केली गेली.[4]

## स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या स्वीकाराचा आग्रह :–

अण्णांवर स्वामी विवेकानंदांच्या आधुनिक शास्त्रीय विचारांचा प्रभाव होता. अंधश्रद्धाळूपणामुळे समाज हा विकलांग होत असतो. त्याकरिता समाजाने हिंदूधर्मातील उदात्त विचारांचा स्वीकार करून अंधश्रद्धाळूवृत्तीला तिलांजली दिली पाहिजे. या स्वामींच्या विचारांचा आग्रह अण्णांनी धरला व त्यातूनच अस्पृश्यतानिवारण, नवसाला दिला जाणारा पशुबळी यांना विरोध, भोंदू भक्तांना विरोध, भुते–खेते, भूतबाधा अशा बाबींविषयक प्रबोधन करून अंधश्रद्धाळू बाबींना प्रचंड विरोध केला. याचाच एक भाग म्हणजे गावातील अस्पृश्यांना सवर्ण समाजाने सन्मानाची वागणूक दिली पाहिजे, असा प्रयत्न अण्णांनी केला. गावातील सार्वजनिक स्थळे, विहिरी, मंदिरे येथे अस्पृश्यांना प्रवेश देण्यात आला. तसेच जातीयतेला कायमचीच मुठमाती देण्याकरिता अस्पृश्यांना सवर्णांच्या पंक्तीत बरोबरीने बसायला लावले. तसेच पोळ्याच्या दिवशी अस्पृश्यांचा मानाचा बैल आधी जाईल, असा ग्रामसभेत ठराव पास करून त्याची प्रत्यक्ष अण्णांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करण्यात आली. अस्पृ''य तरुणांना गावातील मंडळांमध्ये सन्मानाने सहभागी करून घेतले गेले. मागासवर्गीयांच्या वस्त्यांची सुधारणा करण्यात आली. त्यांना मूलभूत सुधारणा गाव पातळीवरून पुरविण्यात आल्यात. थोरामोठ्यांच्या मानवतावादी साहित्याचा परिचय करून तशी शिकवण लोकांना देण्यात आली.[5]

तसेच अंधश्रद्धाळू बाबींना खतपाणी घालणाऱ्या पारंपारिक रूढी–परंपरांना तिलांजली देण्यात आली. संत–महात्मे, थोर महापुरुषांची शिकवण रुजवून उदात्त आणि मानवतावादी विचारांवर आधारित राळेगणसिद्धीची जडण–घडणीची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

## अनिष्ट रूढी–परंपरांना विरोध :–

समाजात अनेक अनिष्ट रूढी–परंपरांचे प्राबल्य असल्यामुळे सामाजिक उन्नतीला त्याचा मोठा अडथळा होता. लग्नात मुलीच्या वडिलांकडून हुंडा घेणे ही तर सर्रास चालणारी प्रथा होती. यामुळे मुलीचे वडील

कर्जबाजारी होणे, मुलींचा बळी जाणे, अनन्वित छळ होणे असे प्रकार घडत असत. अण्णांनी गाव पातळीवर अशा अनिष्ट रूढी बंद करण्याकरिता सामुदायिक बैठकांचे आयोजन केले आणि तरुणांना ह्या रुढींचे होणाऱ्या भीषण परिणामांची जाणीव करून दिली. एवढेच नव्हे तर ग्रामसभेत सर्वानुमते ठराव पास करून मी हुंडा घेणार नाही, असे गावातील तरुणांना वचनबद्ध केले. महत्त्वाचे म्हणजे मुलीच्या वडिलांना लग्न खर्च परवडणारा नव्हता. त्याकरिता प्रसंगी उदरनिर्वाहाकरिता असलेल्या थोड्याफार प्रमाणातील जमिनीही विकाव्या लागत. म्हणून अशा आर्थिक विपन्नावस्थेतून लग्नाच्या मुलीच्या वडिलांची मुक्तता करण्याकरिता सामुदायिक विवाह हा महत्वपूर्ण सामाजिक उपक्रम सुरू केला. गावातील तरुणांचे एक मंडळ स्थापन करून या उपक्रमांचे नियोजन करण्यात येत असे. या आदर्श उपक्रमांमुळे राळेगणसिद्धी संपूर्णतः हुंडामुक्ती गाव म्हणून प्रसिद्धीस आले.[6]

## साथीच्या रोगांवर उपाय :—

सुदृढ युवक व समाजाच्या उभारणीकरीता सार्वजनिक आरोग्य हा अति महत्वाचा विषय आहे. साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव हा अशुद्ध पाण्यामुळे होत असतो. म्हणून गावाला शुद्ध पाणीपुरवठा करण्यावर अण्णांनी भर दिला. त्याशिवाय मलेरिया, अतिसार, नारू, गॅस्ट्रो सारख्या साथीच्या रोगांना आळा घालणे शक्य नव्हते. अण्णांनी सुरुवातीला 'पाणी आडवा पाणी जिरवा' मोहिमेअंतर्गत गाव परिसराच्या जमिनीतील पाण्याची पातळी वाढविली. उघड्या विहिरींच्या पाण्याच्या वापर थांबवून कूपनलिकाद्वारे पाणी उपलब्ध करून दिले. सांडपाण्याकरिता शोषखड्डे करून वाहत्या दूषित पाण्याचे नियोजन केल्याने स्वच्छता राखली गेली. निर्धूर चूल योजना, गोबर गॅस योजना सारख्या योजना राबवून प्रदूषणमुक्त गावाच्या उभारणीवर भर दिला. गर्भवती महिला, नवजात बाळ या विषयी लस व इतर औषधांचा पुरवठा याविषयी सुद्धा ग्रामपंचायतमार्फत उपाययोजना करण्यात आल्या. तसेच आरोग्य संशोधन केंद्राची उभारणी करून ग्रामपातळीवर आरोग्यविषयक खबरदारी घेण्यात आली.[7] यामुळे गावात स्वच्छता ठेवून साथीच्या रोगांना आळा घालण्यात आला. तर ग्रामपातळीवर सामूहिकपणे आरोग्याची समस्या हाताळण्यात आल्याने गावाचा आदर्श ठेवून इतर गावांनासुद्धा प्रेरणा मिळाली.

## पंचसूत्रीचा अवलंब करून गावावर श्रमसंस्कार :—

अण्णांच्या ग्रामविकास कार्यक्रमात पंचसूत्री म्हणजेच नशाबंदी, नसबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, श्रमदान या उपक्रमाला महत्त्वाचे स्थान दिले. जनावरांना मिळणारे खाद्य आणि लोकांना मिळणाऱ्या फळझाडांची गाव परिसरात शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर लागवड केल्यात. वनविभागाच्या मदतीने डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली. पंचसूत्रीचा अवलंब करून ग्रामीण विकासावर भर दिला. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याकरिता 'एक मूल, एक झाड' या आदर्शवत योजनेची अंमलबजावणी केली. यामुळे राळेगणसिद्धीचा परिसर वेली—वनस्पतींनी बहरून निघाला. गॅस प्लॅट आणि सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे इंधनाचा प्रश्न सोडविला गेला.[8] या पंचसूत्रीचा स्वीकार करून अण्णांनी राळेगणसिद्धीला आदर्शवत बनविले.

## राळेगणसिद्धी एक आदर्श ग्रामपंचायत :—

स्वयंपूर्ण खेडे ही महात्मा गांधीजींची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे महान कार्य अण्णा हजारे यांनी सिद्ध केले. आपला भारत हा खेड्यांचा देश आहे. लोकांच्या मूलभूत आणि जीवनावश्यक गरजा ह्या खेड्यातच परिपूर्ण झाल्या पाहिजेत. गावात शांतता सुबत्ता नांदली पाहिजे. जातीभेद, धार्मिक भेद न राहता परस्परांविषयी एकत्व आणि आपुलकीची भावना वाढीस लागली पाहिजे. गावातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक वस्तू अद्यावत पाहिजे. सर्व सुविधांयुक्त असे ग्राम अस्तित्वात आले पाहिजे असे अण्णांना वाटत असे. याकरिता त्यांनी श्रमसंस्कारी तरुणवर्ग तयार केला. सण—उत्सव सामुदायिकपणे साजरा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे समाजामध्ये ऐक्य वाढीस लागले. ग्रामसभेचे श्रेष्ठत्व मान्य करीत सर्वांनीच ग्रामसभेत पारित झालेल्या ठरावांना महत्त्व देत आदराने त्याचे पालन केले. यामुळे गावाची संघशक्ती वाढीस लागून ग्रामविकास साधला गेला. लोकसहभागातून सार्वजनिक नळयोजना कार्यान्वित करण्यात आल्याने पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला.[9]

## सारांश :–

गावातच आदर्श पतसंस्था योजना कार्यान्वित केल्यामुळे गोरगरिबांचा, सामान्य शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाला. यामुळे सावकारी व्यवसायाला पायबंद बसला. अण्णांच्या कार्याची नोंद राज्य, राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांसोबत काही आर्थिक देणग्याही मिळाल्यात. याकरिता अण्णांना 'स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी' या ट्रस्टची स्थापना करून मिळालेला निधी ग्रामाच्या या निधीत ठेवण्यात आली. शेतीबरोबरच दुग्धव्यवसाय सारखे जोडधंदे सुरू करण्यात आले. सर्वत्र चांगल्या मार्कांनी पास झालेल्या मुलांना प्रवेश दिला जात असे. अशी मुले जास्त गुणांनी उत्तीर्ण होणे स्वाभाविक आहे. मात्र अण्णांनी राळेगणसिद्धीत शाळा काढून नापास झालेल्या मुलांना प्रवेश दिला. अशा मुलांना शिकवून ती चांगल्या गुणांनी पास होत असत. अण्णांची ही नापासांची शाळा सर्वदूर परिचित झाली. ग्राम पातळीवर अशा अनेक योजना कार्यान्वित करून स्वयंपूर्ण खेडी ह्या गांधीजींच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप अण्णांनी प्राप्त करून दिले. म्हणूनच आधुनिक गांधी म्हणून अण्णांचा गौरव केला तर ते उचित ठरेल !

## संदर्भ :–


1. अण्णा हजारे, ***राळेगण सिद्धी–एक कायाकल्प***, राळेगणसिद्धी परिवार प्रकाशन, राळेगणसिद्धी (ता. पारनेर, जि. अहमदनगर), 1996, पृ. 19
2. जाधव प्रा. दिनकर बन्सीलाल, ***अण्णा हजारे यांच्या सामाजिक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास, (इ. स. 1975 ते इ. स. 2005)*** पीएच. डी. शोधप्रबंध, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, 2011, पृ. 25
3. ***तत्रैव***, पृ. 26
4. वारघडे सुरेशचंद्र, ***राळेगणसिद्धीचा कर्मयोगी : अण्णा हजारे,*** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, 2003 पृ. 82
5. हजारे अण्णा, ***उपरोक्त क्र. 1,*** पृ. 123
6. डोळे डॉ. बा. म. आणि इतर, ***अभ्यासक्रम पुस्तिका***, ग्रामविकास प्रकाशन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ऑगस्ट 2002, पृ. 74 दिनांक 27 / 11 / 2019 च्या राळेगणसिद्धी येथील ग्रामपंचायतीतील ग्रामसभा ठराव.
7. पानमंद दशरथ व इतर, ***राळेगणसिद्धी : एक सखोल अभ्यास,*** एफआरसी प्रकाशन, मुंबई, 1991, पृ. 26
8. हजारे अण्णा, ***उपरोक्त क्र. 1,*** पृ. 6
9. हजारे अण्णा, ***माझे गाव–माझे तीर्थ***, राळेगणसिद्धी परिवार प्रकाशन, राळेगणसिद्धी (ता. पारनेर, जि. अहमदनगर), 2005, पृ. 8




प्रा.डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,मोराणे, ता.जि.धुळे.

LBP PUBLICATION